# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./११६७/२०२० दि.१३/०३/२०२०

# <u>परिपत्रक</u>

**विषय :- <u>सॅनिटरी नॅपकीन वेडिंग मशीन्स डिस्पोजल मशीन लावण्याबाबत...</u>**

संदर्भ :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्या. पत्र क्र. उशिसं/२०२०/मवि-१/अस्मिता योजना/३१३५, दिनांक ०२/०३/२०२०

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ, विद्यापीठातंर्गत पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तसेच विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, श्रीमती विद्या चव्हाण विधान परिषद सदस्य यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे राज्यातील महिलांना सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेडिंग मशीन्स डिस्पोजल मशीन बसविणे व स्वच्छता याबाबत ठोस कार्यक्रम राबविण्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. त्याअनुषंगाने मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र संलग्नित असुन अवलोकन करण्यास्तव सादर.

ग्रामविकास विभागातंर्गत अस्मिता योजना व सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमांमध्ये मासिकपाळी स्वच्छता संवर्धन योजना राबविण्यात येत आहे. तथापी महिला व किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देणे व डिस्पोजल मशीन बसविणे ही बाब धोरणात्मक असुन त्यांची प्रत्येक स्तरावर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आपल्यां कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अनुदानातुन सॅनिटरी नॅपकिन वेडिंग मशीन्स डिस्पोजल मशीन लावावेत. तसेच लावण्यात आलेले मशीन्स निरंतर चालु स्थितीत राहतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये, सर्व अकृषी विद्यापीटे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांनी उपरोक्त सूचनांप्रमाणे कार्यवाही घ्यावी.

उक्त संलग्नित संदर्भीय पत्राचे अवलोकन करून निर्देशीत दिशा निर्देशांचे पालन व अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने आपल्यास्तरावर कार्यवाही घेवून कार्यवाहीचा अहवाल संबंधीत कार्यालयात सादर करावा तसेच अहवालाची एक प्रत विद्यापीठास उपलब्ध करून देण्याची कार्यावाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**

सहपत्र :- संदर्भीय पत्र संलग्नित.

**<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गड्चिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

3260 4/3/2020

क्र.: उशिसं/२०२०/मवि-१/अस्मिता योजना/ 3135 दिनांक: २९.०२.२०२०

2 MAR 2020
आवक क्र. 1089 दि. 4.3.2

## परिपत्रक

वाचा- १. शासनपत्र क्र.: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४०/आस्था-२ दि. २४.२.२०२०
२. सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र क्र.: लवेसु-२०१९/३७/प्र.क्र.२०१ दि. १३.२.२०२०
३. वि.स.क्र. ११०३१/मविस/ई-२ दि. १७.६.२०१९ चे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, श्रीमती विद्या चव्हाण- विधान परिषद सदस्य यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे राज्यातील महिलांना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन्स डिस्पोजल मशीन बसविणे व स्वच्छता या बाबत ठोस कार्यक्रम राबविण्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे.

उपरोक्त विषयानुषंगाने ग्रामविकास विभागांतर्गत **अस्मिता योजना** व सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमांमध्ये **मासिकपाळी स्वच्छता संवर्धन योजना** राबविण्यात येत आहे. तथापी महिला व किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करुन देणे व डिस्पोजल मशीन बसविणे ही बाब धोरणात्मक असून त्याची प्रत्येक स्तरावर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भांना अनुसरुन **आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अनुदानातुन सॅनिटरी नॅपकीन वेंडिंग मशीन्स डिस्पोजल मशीन लावावेत. तसेच लावण्यात आलेले मशीन्स निरंतर चालू स्थितीत राहतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये, सर्व अकृषी विद्यापीठे, सर्व अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे आणि सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित, मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांनी उपरोक्त सूचनांप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

किती कार्यालयांमध्ये या प्रकारे मशीन बसविण्यात आले आहेत याबाबतचा अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयांमार्फत एकत्रितपणे या संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
४. कुलसचिव, सर्व स्वयं अर्थसहायित विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.
५. प्राचार्य, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये- महाराष्ट्र राज्य.

प्रत: मा. अमोल उगलमुगले- कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना संदर्भ पत्र क्र. १ च्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.